3:00
9-9-2021
आ.क्र.३५८
Scan 9/9/2021

# उल्हासनगर महानगरपालिका
## माहिती व जनसंपर्क विभाग

---

दिनांक : ०९ सप्टेंबर, २०२१

## प्रसिध्दी पत्रक (प्रेसनोट)

**विषय: श्रीगणेश मुर्ती संकलन केंद्रांबाबत मार्गदर्शक सूचना.**

**संदर्भ:**
**१. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७**
**२. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५**
**३. गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र क्र. आरएलपी-०६३२/ प्र.क्र १४४/ विशा-१ ब, दिनांक २९/०६/२०२१**
**४. परिपत्रक क्रमांक उमपा/आ.का/३४४/२०२१, दिनांक १७ ऑगस्ट, २०२१**
**५. परिपत्रक क्रमांक उमपा/आ.का/३५४/२०२१, दिनांक ०८ सप्टेंबर, २०२१**

१. दिनांक १०/०९/२०२१ पासून गणेशोत्सवास प्रारंभ होत असून या संदर्भात शासनाकडून प्राप्त झालेल्या सूचनांच्या अनुषंगाने गणेशोत्स्व साजरा करणेबाबत मार्गदर्शक सूचना परिपत्रक क्रमांक उमपा/आ.का/३४४/२०२१, दिनांक १७ ऑगस्ट, २०२१ अन्वये मा. आयुक्त यांनी निर्गमीत केलेल्या आहेत.

२. या संदर्भात महापालिका प्रशासन, पोलिस प्रशासन व महापालिका पदाधिकारी तसेच गटनेते यांचे समवेत झालेल्या संयुक्त बैठकीत यावर्षी देखील गणेशमुर्ती संकलन केंद्र स्थापन करण्याचा निर्णय सर्वानमुते घेण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने कोरोना/कोव्हिड महामारीच्या काळामध्ये विसर्जन स्थळी भाविकांची होणारी गर्दी टाळण्यासाठी तसेच कोरोनाचा संसर्ग पसरु नये यासाठी महापालिकेतर्फे प्रभाग समितीनिहाय गणेश मुर्ती संकलन केंद्रे निर्माण करण्यात येत आहेत. सदरहु संकलन केंद्रांवर गणेश मूर्तीचा स्विकार करुन पालिकेच्या कर्मचा-यांमार्फत गणेशमुर्तीचे विधीवत विसर्जन करण्यात येईल. सदरहु संकलन केंद्रांचा सविस्तर तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | गणेश मुर्ती संकलन केंद्रांचे ठिकाण |
|---|---|
| | **प्रभाग समिती क्र. १** |
| १ | भगवंती नावानी स्टेज समोर, गोल मैदान, उल्हासनगर-४२१००१. |
| २ | साधु बेला शाळा, उल्हासनगर-४२१००१. |
| ३ | महापालिका शाळा क्रमांक १७, गवळी पाडा, सी.ब्लॉक, उल्हासनगर-४२१००३. |
| | **प्रभाग समिती क्र. २** |
| ४ | प्रभाग समिती क्र. २ कार्यालय, सपना गार्डन समोर,उल्हासनगर-४२१००२. |
| ५ | एस.ई.एस शाळा, खेमाणी, उल्हासनगर-४२१००२. |
| ६ | बोट क्लब, हिराघाट, उल्हासनगर-४२१००३. |
| | **प्रभाग समिती क्र. ३** |
| ७ | प्रभाग समिती क्र. ३ कार्यालय, शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे क्रिडा संकूल, उल्हासनगर-४२१००४. |
| ८ | व्हिनस चौक, माणेरा रोड, उल्हासनगर-४२१००४. |
| ९ | गुरु गुलराज साहेब चौक, गुलराज टॉवरच्या समोर, उल्हासनगर-४२१००३. |
| | **प्रभाग समिती क्र. ४** |
| १० | प्रभाग समिती क्र. ४ कार्यालय, अग्निशमन कार्यालय इमारत, उल्हासनगर-४२१००५. |
| ११ | स्वामी शांतीप्रकाश हॉलच्या बाजुला, गुरुनानक शाळेजवळ, कुर्ला कॅम्प रोड, उल्हासनगर-४२१००४. |
| १२ | कैलास कॉलनी, उल्हासनगर-४२१००५. |

(पुढील पानावर)

३. शक्यतो सर्व गणेशमुर्तीचे विसर्जन घरीच/मंडळाचे मंडपातच करण्यात यावे. घरात/मंडपातच लोखंडी टाकी ठेवून किंवा तत्सम व्यवस्था करुन मुर्तीचे विसर्जन करावे, असे शक्य नसल्यास विसर्जनाची पुजा अर्चा व आरती घरीच/मंडळाचे मंडपात करुन महापालिकेच्या गणेश मुर्ती संकलन केंद्रावर मुर्ती जमा कराव्यात. सदर मुर्तीचे महापालिकेमार्फत विधीवत विसर्जन करण्यात येईल.

४. सर्व प्रभाग अधिकारी यांनी या मार्गदर्शक सूचनांची प्रसिध्दी आपल्या प्रभाग समिती कार्यक्षेत्रात उद्घोषणेव्दारे करुन व्यापक प्रमाणात प्रसिध्दी करावी.

५. शासनाने, महानगरपालिका व पोलीस प्रशासनाने वेळोवेळी विहित केलेल्या नियमांचे अनुपालन करणे बंधनकारक राहील. तसेच या परिपत्रकानंतर व प्रत्यक्ष सण सुरु होण्याच्या मधल्या कालावधीत अजुन काही सूचना प्राप्त झाल्यास त्यांचे अनुपालन करणे बंधनकारक असेल.

वरील सर्व सुचनांचे पालन करुन उल्हासनगर महानगरपालिका प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन मा.डॉ.राजा दयानिधी (भा.प्र.से.) आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका यांनी शहरवासीयांना केले आहे.

(युवराज भदाणे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

सोबत : जा.क्र.उमपा/आ.का./३५४/२०२१, दिनांक ०८ सप्टेंबर, २०२१ चे परिपत्रक.

प्रत – योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका